# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र.९३/२०२२/जळगांव**

| तक्रारदार | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.किशोर तुकाराम तळेले<br>रा.मु.पो.बामणोद,<br>ता.यावल, जि.जळगांव.<br>४२५५०३. | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हा परिषद, जळगांव.<br>ता.जि.जळगांव. | -- |

**तक्रार सुनावणी दिनांक ३१/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दि.०२/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीच्या सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारदार अनुपस्थित आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.०२/०३/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार आजतागायत माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

३. आयोगाने द्वितीय अपिल क्र.२८७/२०१९/जळगांव संदर्भात दि.२७/०८/२०२० रोजी झालेल्या सुनावणीत "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव श्री.डी.एम.देवांग यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थीस त्यांच्या दि.२४/०९/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी" असे आदेश पारित केले आहेत.

४. आज सुनावणीवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांचे दि.२९/०१/२०२४ रोजीच्या लेखी निवेदनाची प्रत आयोगास सादर केली आहे. सदरच्या लेखी निवेदनात तक्रारदार यांनी असे नमूद केले आहे की, तक्रार क्र.८७/२०२२/जळगांव ते क्र.९८/२०२२/जळगांव संदर्भात यापूर्वी सुनावणी होवून काही प्रकरणांमध्ये शास्तीची कारवाई झालेली असून काही निकाली निघालेले आहे. त्यामुळे दि.३१/०१/२०२४ रोजी असलेली तक्रारींवरील सुनावणी रद्द करुन सदर सर्व तक्रारी निकाली काढण्यात याव्यात ही विनंती.

सबब, तक्रारदार यांच्या उपरोक्त लेखी निवेदनाच्या अनुषंगाने याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र.९३/२०२२/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जावक क्र. ३१-९२५७ दिनांक :- 28 MAY 2024